# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/१२/२०१६/१३८७ दि. २९.०१.२०१६

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नं. ८, रुम नं.४,
उल्हासनगर -१

**विषय :- आपला दि. २१ जानेवारी, २०१६ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. २१ जानेवारी, २०१६ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २५ जानेवारी, २०१६ रोजी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.-

| आवश्यक माहितीचा तपशील | खुलासा |
|---|---|
| सदर कोणत्याही विज ग्राहकाचे थकबाकी रक्कम दोन वर्षापूर्वीची किंवा १० वर्षापूर्वीची असेल व दुसऱ्याने तती जागा खरेदी केली असल्यास त्या ग्राहकाला पहिल्या विज ग्राहकाची थकबाकी कित भरावी लागणार व बिनव्याजी भरावी लागणार का याची स्वाक्षारी प्रत सक्युर्लसह मिळावी. | अर्जदारास नेमके कोणते दस्तावेज हवेत याचा स्पष्ट उल्लेख होत नाही. तथापि, अर्जदार मविनिआ (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याची इतर अटी) विनियम, २००५ व विद्युत कायदा, २००३ चे अवलोकन करु शकतो.<br>सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. (३१ पृष्ठे) |

आपणास हवी असलेल्या माहितीच्या छायांकित प्रति माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार प्रति पृष्ठ रू २/- या प्रमाणे ३१ पृष्ठांकरीता रोख रू ६२/- व अधिक पोस्टल चार्जेस रु. ५०/- असे एकूण ११२/- रोखीने किंवा तितक्या रकमेचा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग या नावाने धनाकर्ष (DD) आयोगाच्या कार्यालयात जमा करावा. जेणे करुन माहिती उपलब्ध करणे शक्य होईल.

उपरोक्त दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदीप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in